भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४५६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०६/२०१७

**१) संगनमत करुन कुंपणाच्या जागेच्या वादावरुन शिवीगाळ, भांडण करुन कुऱ्हाडीचे दांडयाने, काठीने डोक्यावर मारुन जखमी करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १८/०६/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी किशोर चंद्रभान जनबंधु वय ३८ वर्ष, रा. घानोळ व आरोपी यांच्यात कुंपणाच्या जागे वाद असुन यातील फिर्यादी हा आपले स्वतःचे घराचे मागील जागेत वॉल कंपाऊन्ड तयार करण्याकरीता नाली खोदत असतांना आरोपीतांनी संगनमत करुन ही जागा आमची आहे असे म्हणुन भांडण करुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे डोक्यावर कुऱ्हाडीचे दांडयाने मारुन जखमी केले व आरोपी क्र. ४ ने फिर्यादीचे भावाचे पाठीवर मारुन काठीने मारुन दुखापत केली व आरोपी क्र. १ व ३ यांनी थापडबुक्यांनी मारुन शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १८/०६/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. लाखांदुर येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साठवने पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्‌देशाने अंधारात आपले अस्तित्व लपवुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०६/२०१७ चे १८.२५ ते १९.५५ वा. दरम्यान यातील आरोपी हे लाला लचपतराय वार्ड येथील बगीच्या जवळ अंधारात आपले अस्तित्व लपवित छपवीत दखलपात्र गुन्हा करण्याच्या हेतुने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भोगे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १२२(ब) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पो. स्टे भंडारा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन पाणी वागविण्याच्या कारणावरुन ककाठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १८/०६/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी महेश नामदेव हटवार वय २५ वर्ष, रा. भागडी हा आपले शेतात धानाच्या पऱ्याला पाणी वागवित असतांना शेतातील विहीरीत पाणी वागविण्याचे कारणावरुन यातील आरोपी क्र. १ ने मोटार पंपचे ग्रीप काढले व आरोपी क्र. २ ने संगनमत करुन फिर्यादीचे डोक्यावर, उजवे बाजुचे खांदयावर मैदीच्या काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखांदुर येथे कलम ३२४,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. वलके पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

५) औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु. :—

दिनांक १८/०६/२०१७ चे ०५८.०० वा. दर. यातील मृतक मिराबाई नामदेव भुरे वय ७० वर्ष, रा. नेहरु वार्ड भंडारा हिची अचानक प्रकृती बिघडल्याने तिस औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो व मृतकचे मुलाचे बयाना वरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. फुंडे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्हाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १८/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.